नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प,

वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी भारत मौसम विभाग

ईमेल - mahapocra@gmail.com, gkmsparbhani@yahoo.com

उस्मानाबाद कृषि हवामान सल्ला मंगळवार, दिनांक – २८.०७.२०२०

हवामान घटक	हवामान अंदाज (दिनांक २९ जुलै ते ०२ ऑगस्ट, २०२०)				
दिनांक	२९/०७	३०/०७	३१/०७	०१/०८	०२/०८
पाऊस (मिमी)	३२.०	२१.०	२८.०	४०.०	४६.०
कमाल तापमान (अं.से.)	२९.०	३०.०	३०.०	३०.०	३१.०
किमान तापमान (अं.से.)	२२.०	२१.०	२०.०	२१.०	२१.०
ढग स्थिती (आकाश)	ढगाळ	ढगाळ	ढगाळ	ढगाळ	ढगाळ
सकाळची सापेक्ष आर्द्रता (%)	८६	८२	८५	८७	९०
दुपारची सापेक्ष आर्द्रता (%)	६०	५८	५७	६१	६४
वा-याचा वेग (किमी / तास)	१२	१०	१०	१५	१७
वा-याची दिशा	वायव्य	वायव्य	वायव्य	वायव्य	वायव्य

हवामानाचा इशारा	जिल्हयात पुढील पाच दिवसात आकाश ढगाळ राहुन हलका ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता आहे.	
पिकांचे नाव	अवस्था	कृषि हवामान सल्ला
कापूस	फांदया फुटणे ते फुलधारणा	कापूस पिकात आंतर मशागतीची कामे करून तणांचे व्यवस्थापन करावे. कापूस पिकावरील गुलाबी बोंडअळीच्या व्यवस्थापनासाठी हेक्टरी ५ गुलाबी बोंडअळीसाठीचे कामगंध सापळे लावावेत. सुरूवातीस ५% निंबोळी अर्काची फवारणी करावी, प्रादुर्भाव जास्त असल्यास प्रोफेनोफॉस ५०% ४०० मिली किंवा प्रोफेनोफॉस ४०% + सायपरमेथ्रीन ४% (संयुक्त किटकनाशक) ४०० मिली प्रती एकर आलटून पालटून पावसाने उघाड दिल्यास फवारावे. कापूस पिकात रसशोषक (मावा, तुडतूडे) किडींच्या व्यवस्थापनासाठी ५% निंबोळी अर्काची फवारणी करावी किंवा कमी प्रादुर्भाव असल्यास थायामिथॉक्झाम २५% ४० ग्रॅम किंवा क्लोथिनीयाडीन ५०% ३० ग्रॅम प्रती एकर पावसाने उघाड दिल्यास फवारावे. प्रादुर्भाव जास्त असेल तर फलोनीकॅमीड ५०% ६० ग्रॅम प्रती एकर फवारावे. पाऊस झाल्यानंतर पेरणी केलेल्या पिकात पाणी साचणार नाही याची दक्षता घ्यावी. पिकातील अतिरीक्त पाण्याचा निचरा होईल अशी व्यवस्था करावी.
तुर	वाढीची अवस्था	तुर पिकात आंतर मशागतीची कामे करून तणांचे व्यवस्थापन करावे. पिकावरील खोड माशीचा प्रादुर्भाव दिसून येत असल्यास ५% निंबोळी अर्काची पावसाने उघाड दिल्यास फवारणी करावी. पाऊस झाल्यानंतर पेरणी केलेल्या पिकात पाणी साचणार नाही याची दक्षता घ्यावी. पिकातील अतिरीक्त पाण्याचा निचरा होईल अशी व्यवस्था करावी.
मुग / उडीद	फुलोरा ते शेंगा लागणे	मुग / उडीद पिकात मावा किडीचा प्रादुर्भाव दिसून येत असल्यास याच्या व्यवस्थापनासाठी ५% निंबोळी अर्काची किंवा डायमिथोएट ३०% २४० मिली प्रती एकर पावसाने उघाड दिल्यास फवारणी करावी. पाऊस झाल्यानंतर पेरणी केलेल्या पिकात पाणी साचणार नाही याची दक्षता घ्यावी. पिकातील अतिरीक्त पाण्याचा निचरा होईल अशी व्यवस्था करावी.

मका	वाढीची अवस्था	मका पिकावरील लष्करी अळीचा प्रादुर्भाव दिसून येत असल्यास याच्या व्यवस्थापनासाठी थायामिथोक्झाम १२.६% + लॅमडा सायहॉलोथ्रीन ९.५% ५ मिली किंवा स्पिनेटोरम ११.७ एससी ४ मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून पावसाने उघाड दिल्यास वरील किटकनाशकांची आलटून पालटून फवारणी करावी. फवारणी करत असताना किटकनाशक पोंग्यात पडेल अशाप्रकारे फवारणी करावी. पाऊस झाल्यानंतर पेरणी केलेल्या पिकात पाणी साचणार नाही याची दक्षता घ्यावी. पिकातील अतिरीक्त पाण्याचा निचरा होईल अशी व्यवस्था करावी.
द्राक्ष	वाढीची अवस्था	द्राक्ष बागेतील फुटवे काढावेत. बागेत रोगाचा प्रादुर्भाव दिसून येत असल्यास रोगनाशकाची फवारणी करावी. पाऊस झाल्यानंतर फळबागेत पाणी साचणार नाही याची दक्षता घ्यावी. बागेतील अतिरीक्त पाण्याचा निचरा होईल अशी व्यवस्था करावी.
केळी	वाढीची अवस्था	नवीन लागवड केलेल्या केळी बागेत आंतरमशागीची कामे करून तणांचे व्यवस्थापन करावे. नत्र खताची दुसरी मात्रा ५० ग्रॅम नत्र प्रती झाड दिली नसल्यास दयावी. बागेतील पिल्ले काढावेत. पाऊस झाल्यानंतर फळबागेत पाणी साचणार नाही याची दक्षता घ्यावी. बागेतील अतिरीक्त पाण्याचा निचरा होईल अशी व्यवस्था करावी.
आंबा	वाढीची अवस्था	नवीन लागवड केलेल्या आंबा बागेत आंतरमशागीची कामे करून तणांचे व्यवस्थापन करावे. पाऊस झाल्यानंतर फळबागेत पाणी साचणार नाही याची दक्षता घ्यावी. बागेतील अतिरीक्त पाण्याचा निचरा होईल अशी व्यवस्था करावी.
सिताफळ	फुलधारणा अवस्था	नवीन लागवड केलेल्या सिताफळ बागेत आंतरमशागीची कामे करून तणांचे व्यवस्थापन करावे. पाऊस झाल्यानंतर फळबागेत पाणी साचणार नाही याची दक्षता घ्यावी. बागेतील अतिरीक्त पाण्याचा निचरा होईल अशी व्यवस्था करावी.
भाजीपाला	वाढीची अवस्था / काढणी	भाजीपाला पिकात आंतरमशागीची कामे करून तणांचे व्यवस्थापन करावे. भेंडी पिकावरील मावा किडीच्या व्यवस्थापनासाठी ॲसिटामिप्रीड २०% २ ग्रॅम किंवा थायामिथॉक्झाम २५% २ ग्रॅम प्रती १० लिटर पाण्यात मिसळून पावसाने उघाड दिल्यास फवारणी करावी. टोमॅटो पिकावरील जिवाणूजन्य करपा रोगाच्या व्यवस्थापनासाठी कॉपरऑक्सीक्लोराईड २५ ग्रॅम + स्ट्रेप्टोसायक्लीन १ ग्रॅम प्रती १० लिटर पाण्यात मिसळून पावसाने उघाड दिल्यास फवारणी करावी. पाऊस झाल्यानंतर लागवड केलेल्या पिकात पाणी साचणार नाही याची दक्षता घ्यावी. पिकातील अतिरीक्त पाण्याचा निचरा होईल अशी व्यवस्था करावी.
फुलशेती	वाढीची अवस्था	फुलपिकात आंतरमशागीची कामे करून तणांचे व्यवस्थापन करावे. पाऊस झाल्यानंतर लागवड केलेल्या पिकात पाणी साचणार नाही याची दक्षता घ्यावी. पिकातील अतिरीक्त पाण्याचा निचरा होईल अशी व्यवस्था करावी.
पशुधन व्यवस्थापन	--	पशुधनास संसर्गजन्य रोगाचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी, विशेषत: पावसाळयापूर्वी लसीकरण अत्यावश्यक आहे. परंतु याव्यतिरीक्त पशुंची रोगप्रतीकारक शक्ती वाढण्यासाठी जंतनाशक, संतुलित आहार, यासोबतच उपयुक्त वनऔषधीची ओळख व खात्री करून योग्य प्रमाणात देणे हितकारक ठरते. यासाठी अश्वगंधा (१० ग्रॅम) मंजीष्ठा (८ ग्रॅम), तुळस (५ ग्रॅम), तरवट /तरोटा (८ ग्रॅम व आंब्याच्या कोयीतील गर (१२ ग्रॅम) इत्यादी घटक एकत्र करून, हे मिश्रण एक लिटर स्वच्छ पाण्यात द्रावण अर्धे (५०० मिली) होईपर्यंत उकळावे, उकळल्यानंतर गाळून घ्यावे व चोथा फेकून दयावा. उरलेला अर्क १ लिटर होईपर्यंत त्यात पाणी टाकावे. सदरील अर्क मोठया पशुमध्ये (गाय, म्हैस, घोडा) इत्यादी १५ ते ३० मिली प्रती दिन, शेळी, मेंढी व वासरे इत्यादीमध्ये १० ते १५ मिली प्रती दिन, तर कुक्कुट पक्ष्यांमध्ये (पिल्ले ५ मिली / १०० पक्षी/ प्रतिदिन, ग्रोअर्स १० मिली / १०० पक्षी / प्रतिदिन, लेअर्स व ब्रॉयलर कोंबडयांना १५ मिली / १०० पक्षी / प्रतिदिन या मात्रेत दयावा.

सदर कृषि सल्ला पत्रिका डॉ पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, परभणी येथील ग्रामीण कृषि मौसम सेवा योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशीवरून तयार करून प्रसारित करण्यात आली असून नानाजी देखमुख कृषी संजीवनी प्रकल्प कार्यालय मुंबई येथून प्रसारित करण्यात आलेली आहे.